# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## मतदारांच्या माहितीकरिता

विद्यापीठ अधिकार मंडळांच्या निवडणूकीसंदर्भात दि.17 मे, 2017 रोजी प्रसिध्द झालेल्या एकरूप परिनियम 6 (1) मधील तरतुदीनुसार खालील कारणास्तव मतपत्रिका अवैध (Invalid) ठरविण्यात येतील. (पसंती क्रमांक इंग्रजी किंवा मराठी यापैकी कोणत्यातरी एकाच पध्दतीने लिहिणे आवश्यक आहे. तसेच पसंतीक्रम अक्षरी किंवा रोमन अंकांत नमूद करता येणार नाहीत.)

A) मतदारांना मतदानास येताना खालीलपैकी एक ओळखपत्र स्वत:सोबत आणणे बंधनकारक आहे. त्याखेरीज मतदानचा हक्क बजावता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

१. भारतीय / राज्य निवडणूक आयोगाने दिलेले ओळखपत्र

२. पासपोर्ट

३. वाहन चालविण्याचा परवाना

४. आयकर विभागाकडील पॅनकार्ड

५. केंद्र शासन / राज्य शासन / सार्वजनिक उपक्रम, स्थानिक स्वराज्य यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना फोटोसहित दिलेले ओळखपत्र.

६. राष्ट्रीयकृत बँकेचे / किसान / पोष्टाचे पासबुक यामधील फोटो असणारे पासबुक

७. स्वातंत्र्य सैनिकाचे ओळखपत्र

८. समक्ष प्राधिकाऱ्याने अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / इतर मागासवर्गीय / विमुक्त जाती / भटक्या जमाती / विशेष मागास प्रवर्ग इ. फोटोसहित दिलेले जातीचे प्रमाणपत्र

९. समक्ष प्राधिकरणाने फोटोसहित दिलेला अपंगत्वाचा दाखला

१०. मालमत्ताबाबतची कागदपत्रे नोंदणीखत फोटोसहित

११. फोटोसहित शास्त्रास्त्र परवाना

१२. राष्ट्रीय ग्रामिण योजना खालील फोटो असलेले ओळखपत्र

१३. निवृत्त कर्मचाऱ्यांचे फोटो असलेले पासबुक

१४. निवृत्त कर्मचाऱ्यांच्या विधवा / अवलंबित व्यक्ती यांचे फोटो असलेले ओळखपत्र

१५. केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयाने दिलेल्या आरोग्य विमा योजनेचे फोटोसहित कार्ड

१६. शिधा पत्रिका (फोटोसहित)

१७. आधारकार्ड

## B) पसंती क्रमांक मतपत्रिकेमध्ये नमूद करण्याबाबतच्या सूचना

1. कोणत्याही एका उमेदवाराच्या नांवासमोर प्रथम पसंतीदर्शक 1 हा अंक नमूद केला नसल्यास.

2. एकाहून अधिक उमेदवारांच्या नांवासमोर प्रथम पसंतीदर्शक 1 हा अंक नमूद केल्यास.

3. एकाच उमेदवाराच्या नांवासमोर 1 हा अंक नमूद करून इतरही अंक नमूद केला असल्यास.

4. पसंतीदर्शक 1 हा अंक कोणत्या उमेदवारास दिला आहे हे निश्चित करणे अशक्य झाल्यास.

5. मतदाराने आपले मत मतपत्रिकेवर नमूद करताना नंतर ती ओळखून यावी यासाठी अंकाशिवाय इतर कोणतीही खूण केली असल्यास.

   उदा. अ) मतदाराने मतपत्रिकेवर आपली सही केल्यास.

   ब) कमांक अक्षरांत नोंद केल्यास (एक, दोन, तीन इ.)

   क) अंकात मत नमूद केल्यानंतर सदर अंकास इतर खूणा केल्यास.

6. मतपत्रिकेवर पसंतीदर्शक अंकामध्ये कोणतोही खाडाखोड किंवा कोणताही बदल असल्यास.

7. निळ्या शाई खेरीज अन्य कोणत्याही शाईने पसंती दर्शविली असेल.

**उपरोक्त बाबींची नोंद घेवून आपले बहुमूल्य मत अचूक नोंदवावे.**

**निवडणूक अधिकारी तथा कुलसचिव**